शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना
अति उत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ
वेतनवाढी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र.डीएसआर (आवेवा)-२००२/प्र.क्र.१८१/आस्था-५(१८)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३ सप्टेंबर, २००२.

वाचा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०८१/१४३३/ सीएन-११९/८, दि.२४/१२/१९८१.
२) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र.डीएसआर २४८९/सीआर-२८८/१८, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९८९.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.डीएसआर-२४९०/प्र.क्र.२६०/१८, दिनांक २३ जुलै, १९९०.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आपेपा-१०९०/प्र.क्र.१५२/८, दिनांक २९/१०/९०.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.आपेपा-१०९२/प्र.क्र.५९/९२/८, दिनांक ५/११/९२.
६) शासन पृष्ठांकन, ग्राम विकास विभाग, क्र.डीएसआर २४९७/२७२९/सीआर-४६/१८, दि.५ मार्च, १९९७.
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आवेवा-१००२/प्र.क्र. ११/ २००२/आठ, दिनांक ११-८-२००२.

शासन परिपत्रक :

संदर्भाधिन शासन निर्णय/आदेशातील तरतूदीच्या आधारे जिल्हा परिषद व कर्मचा-यांना अति उत्कृष्ट कामाबाबत आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यांत येतात. सदर आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबतची योजना यथास्थितीत चालू ठेवावी किंवा कसे, तसेच त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत पुर्नविचार करणे बाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रस्तावावर अंतिम निर्णय होई पर्यंत सामान्य प्रशासन विभागाच्या वरील दि.१९ ऑगस्ट, २००२ च्या शासन परिपत्रकानुसार दि.१ ऑक्टोबर २००२ रोजी देय होणा-या आगाऊ वेतनवाढीच्या प्रस्तावावर कार्यवाही करण्यास पुढील आदेश होई पर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. ती स्थगिती जिल्हा परिषदांकडील कर्मचा-यांच्या संदर्भातही महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २४८ नुसार प्रदान करण्यांत आलेल्या कलमानुसार लागू करण्यांत येत आहे.

सर्व जिल्हा परिषदांनी त्यांचे कर्मचा-यांच्या बाबतीत वर नमूद केल्याप्रमाणे स्थगिती लक्षात घेऊन केवळ विहित मुदतीत प्राप्त होणारे दि.१ ऑक्टोबर, २००० व दि.१ ऑक्टोबर, २००१ रोजी देय झालेल्या आगाऊ वेतनवाढी प्रस्ताव प्रचलित नियमानुसार विचारात घ्यावे.

वरील आदेशांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा. का. पवार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त (विकास शाखा)
२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.आस्था-७, आस्था-८, आस्था-९, आस्था-१०, आस्था-११ व आस्था-१२
४) उप सचिव (का. ३ाठ) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५) निवड नस्ती, कार्यासन क्र.आस्था-५.